# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- पाणी पृथ्थकरण खर्च व पाणी शुद्धीकरण रसायन खरेदी या लेखाशिर्षकात अर्थसंकल्पीय तरतुदीचे पुर्नविनियोजन करणे कामीच्या प्रशासकीय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.प्रशासक तथा आयुक्त यांना अधिकार आहेत. त्याचप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दर वर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाजपत्रक तयार केले जातात. सन २०२४ - २०२५ या आर्थीक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थीक तरतूद करण्यांत आली होती. या तरतूदीमधून आतापर्यत खर्च करण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे नमूद आहे.

**(आकडे लाखात)**

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद | सन २०२४-२५ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | शिल्लक | पुर्नविनियोजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | **पाणी पृथ्थकरण खर्च** | ५०.०० | ३३.२३ | १६.७७ | १० लक्ष |
| २ | **पाणी शुद्धीकरण रसायन खरेदी** | ४०.०० | २२.५५ | १७.४५ | २० लक्ष |
| | | | | **एकुण** | **३० लक्ष** |

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये **पाणी पृथ्थकरण खर्च व पाणी शुद्धीकरण रसायन खरेदी** विशेष बाब या सोईच्या दृष्टीने शहरातील नागरीकांना शुध्द पाणी पुरवठा होणेकरीता निधी अभावी प्रस्ताव प्रलंबित आहेत. सदर लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजनाच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूदी व विशेष: व कलम ४५२ (अ) च्या कलम (१ब) नुसार मा.प्रशासक तथा आयुक्त सो यांनी दि.१३/०९/२०२४ रोजी मान्यता मिळालेली आहे.

शासन आदेश क्र.एम.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ रोजी नुसार मा.महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियक्त करण्यात आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.

१) सन २०२४-२५ या आर्थीक वर्षाकरीता **पाणी पृथ्थकरण खर्च** या लेखाशिर्षकात रु.५०.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतूदीमधून रु.३३.२३ लक्ष खर्च झाले आहे उर्वरीत रु.१६.७७ लक्ष तरतूद शिल्लक असुन मंजुर कामांचे प्रस्ताव एकुण रु.१०.०० लक्ष निधी अभावी प्रलंबित आहेत. त्यामुळे **पाणी पृथ्थकरण खर्च** या लेखाशिर्षात **रु.१०.०० लक्ष पुर्नविनियोजन** करणेची आवश्यकता आहे.

२) सन २०२४-२५ या आर्थीक वर्षाकरीता **पाणी शुद्धीकरण रसायन खरेदी** या लेखाशिर्षकात रु.४०.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतूदीमधून रु.२२.५५ लक्ष खर्च झाले आहे. उर्वरीत रु.१७.४५ लक्ष तरतूद शिल्लक

असुन मंजुर कामांचे प्रस्ताव एकुण रु.२०.०० लक्ष निधी अभावी प्रलंबित आहेत. त्यामुळे **पाणी शुद्धीकरण रसायन खरेदी** या लेखाशिर्षात **रु.२०.०० लक्ष पुर्नविनियोजन** करणेची आवश्यकता आहे.

सन २०२४-२५ या आर्थीक वर्षात पाणी पुरवठा विभागाकडील **विविध प्रकल्पाकरीता तांत्रिक सल्लागार फी खर्च** या लेखाशिर्षात रु.२००.०० इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतूदीमधून आतापर्यत कोणताही खर्च झालेला नाही. त्यामुळे रु.२००.०० लक्ष तरतूद शिल्लक आहे. या तरतूदीमधून १) **पाणी पृथ्थकरण खर्च** या लेखाशिर्षात रु.१०.०० लक्ष व २) **पाणी शुद्धीकरण रसायन खरेदी** या लेखाशिर्षात रु.२०.०० लक्ष असे एकुण **रु.३०.००** लक्ष पुर्नविनियोजन करणेकरीता पाणी पुरवठा विभागाकडून प्रस्तावीत करण्यात येत आहे.

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२५ या आर्थीक वर्षात पाणी पुरवठा विभागाकडील **विविध प्रकल्पाकरीता तांत्रिक सल्लागार फी खर्च** या लेखाशिर्षात रु.२००.०० इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतूदीमधून आतापर्यत कोणताही खर्च झालेला नाही. त्यामुळे रु.२००.०० लक्ष तरतूद शिल्लक आहे. या तरतूदीमधून १) **पाणी पृथ्थकरण खर्च** या लेखाशिर्षात रु.१०.०० लक्ष व २) **पाणी शुद्धीकरण रसायन खरेदी** या लेखाशिर्षात रु.२०.०० लक्ष असे एकुण **रु.३०.००** लक्ष पुर्नविनियोजन करणेकरीता मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** ५८१ **दिनांक :** २४/०९ / २०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२५ या आर्थीक वर्षात पाणी पुरवठा विभागाकडील **विविध प्रकल्पाकरीता तांत्रिक सल्लागार फी खर्च** या लेखाशिर्षात रु.२००.०० इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतूदीमधून आतापर्यत कोणताही खर्च झालेला नाही. त्यामुळे रु.२००.०० लक्ष तरतूद शिल्लक आहे. या तरतूदीमधून १) **पाणी पृथ्थकरण खर्च** या लेखाशिर्षात रु.१०.०० लक्ष व २) **पाणी शुद्धीकरण रसायन खरेदी** या लेखाशिर्षात रु.२०.०० लक्ष असे एकुण **रु.३०.००** लक्ष पुर्नविनियोजन करणेकरीता मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील **विविध प्रकल्पाकरीता तांत्रिक सल्लागार फी खर्च** या लेखाशिर्षात रु.२००.०० इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतूदीमधून आतापर्यत कोणताही खर्च झालेला नाही. त्यामुळे रु.२००.०० लक्ष तरतूद शिल्लक आहे. या तरतूदीमधून १) **पाणी पृथ्थकरण खर्च** या लेखाशिर्षात रु.१०.०० लक्ष व २) **पाणी शुद्धीकरण रसायन खरेदी** या लेखाशिर्षात रु.२०.०० लक्ष असे एकुण **रु.३०.००** लक्ष पुर्नविनियोजन करणेकरीता **प्रशासकिय मंजुरी** देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिका मालकिचे काटई गावामधील मल:प्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशनची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करणे कामी पहिल्या मुदतवाढीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी महानगरपालिकेच्या मालकीचे काटई गावामधील मल:प्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन हे मार्च २०१६ रोजी बांधून पुर्ण होऊन चाचणी व परिक्षणानंतर सुरु करण्यांत आलेले आहे. काटई येथील नविन १३ द.ल.ली. क्षमतेचे व जुने १७ द.ल.ली. क्षमतेचे मल:प्रक्रिया केंद्रे अस्तित्वात असुन सद्यस्थितीत नवीन १३ द.ल.ली. क्षमतेचे मल:प्रक्रिया केंद्र कार्यान्वित आहे. तसेच अजय नगर येथील पंपींग स्टेशन कार्यान्वित आहे. सदर संपुर्ण प्रकल्प चालु स्थितीत ठेवणे करीता मनपा आस्थापनेवर सदर बाबतचे तांत्रिक ज्ञान असलेले अभियंते / कर्मचारी उपलब्ध नाहीत.

सद्यस्थितीत ७ ते ८ द.ल.ली. इतक्या पाण्यावर प्रक्रिया होत असुन सदर मल:प्रक्रिया केंद्र कार्यान्वित होऊन अडीच वर्षाचा कालावधी झाल्यामुळे बऱ्याच प्रमाणात दुरुस्तीचे काम करावे लागणार आहे.

तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांचे कडुन सदरचे मल:प्रक्रिया केंद्र कार्यान्वित ठेवणे बाबत वारंवार नोटीसद्वारे कळविले आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिका मालकिचे काटई गावामधील मल:प्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशनची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या कामास ई-निविदा मागविणे कामीची कार्यवाही सुरु होती परंतु मा. लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ करीता आदर्श आचारसंहिता तसेच पदविधर मतदार संघाची निवडणुकीची आचारसंहिता सुरु झाल्यामुळे निविदा प्रक्रियेस विलंब झालेला आहे.

सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिका मालकिचे काटई गावामधील मल:प्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशनची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतची ई निविदा मे. कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स प्रा. लि., कल्याण यांचे नावे मंजूर झालेली होती. सदर निविदेची मुदत दि.३१/०३/२०२४ रोजी मुदत संपलेली आहे.

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा.महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे मा. प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत. सद्यस्थितीत सदर कामाची मुदत संपलेली आहे.

मे. कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स प्रा. लि., कल्याण यांना जा.क्र./भिनिशमनपा/पा.पु.वि./ ८८५/२०२३, दि.०८/०६/२०२३ रोजी अन्वये कार्यादेश देण्यांत आलेला आहे. दि.०१/०४/२०२४ ते दि.३०/०९/२०२४ रोजी पर्यंत ६ महिन्यांकरीता सन २०२३-२०२४ च्या निविदेतील मंजुर दरानुसार म्हणजेच रु.५९,३५,०३१/- मात्रच्या रक्कमेस सदर कालावधी करीता **मे. कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स प्रा. लि., कल्याण,** यांना पहिली मुदतवाढ देणे आवश्यक आहे. संबंधीत ठेकेदार यांचे कडुन माहे एप्रिल २०२४ पासुन काम करुन घेण्यात येत असुन उर्वरीत मुदतवाढीच्या कालावधी पर्यंत काम सुरु ठेवण्यात येणार आहे. तरी झालेल्या कामाची कार्योत्तर व उर्वरीत कामाकरीता मुदतवाढीस मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

पाणी पुरवठा विभागातील काम अत्यावश्यक सेवेत मोडत आहे. **सन २०२४-२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिका मालकिचे काटई गावामधील मल:प्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग**

स्टेशनची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या सन २०२३-२४ च्या मंजूर निविदेतील दरानुसार दि.०१/०४/२०२४ ते दि.३०/०९/२०२४ रोजी पर्यंत ६ महिन्यांच्या कालावधी करीता रु.५९,३५,०३१/- मात्र इतकी रक्कम होत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे काटई गावांमधील मलप्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन यांची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे कामी पहिल्या मुदतवाढीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.** | **रु.५९,३५,०३१/-** |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे काटई गावांमधील मलप्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन यांची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे कामी पहिल्या मुदतवाढीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे कामी मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** ५८२ **दिनांक :** २४/०९/ **२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे काटई गावांमधील मलप्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन यांची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे कामी पहिल्या मुदतवाढीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा** प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. . एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे काटई गावांमधील मलप्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन यांची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे कामी पहिल्या मुदतवाढीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतच्या** रु. ५९,३५,०३१/- मात्रच्या कामास **आर्थिक व प्रशासकिय मान्यता** देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

**विषय:-भिवंडी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (यांत्रिकी)- (वर्ग-१) या पदावरील तात्पुरत्या पदोन्नती करीता विभागीय पदोन्नती समितीने शिफारस केलेल्या निवडसूचीस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावना**

जा.क्र./भिनिशमनपा./ आस्था./२२९६/२०२४, दि. ०५/०८/२०२४ नुसार श्री. चंद्रशेखर चौधरी यांचे उपअभियंता (यांत्रिकी) पदी पदोन्नती देणेकामी यापूर्वी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीमध्ये श्री. शेखर चौधरी यांचे न्यायालयीन प्रकरण निर्णय होईपर्यंत स्थगित ठेवण्यात आले होते. श्री. शेखर चौधरी यांची विभागीय चौकशी पूर्ण झालेली असून त्यांना दोषमुक्त केलेले आहे. तसेच मा. कोर्टाने दोषारोप किंवा ठपका ठेवलेला नाही.

याअनुषंगाने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (यांत्रिकी) (वर्ग-१) या संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या पदोन्नतीने प्रचलित शासन निर्णयान्वये भरणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदोन्नतीने भरावयाच्या उप अभियंता (यांत्रिकी) (वर्ग-१) संवर्गातील रिक्त पदांवर पदोन्नती देण्यासाठी पात्र कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) यांची निवडसूची तयार करणेकामी गठीत विभागीय पदोन्नती समितीची बैठक दि. ११/७/२०२४ रोजी दुपारी ११.०० वाजता मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांचे दालनात संपन्न झालेली आहे. सदर विभागीय पदोन्नती समितीचे बैठकीत उपरोक्त पदावरील खालिलप्रमाणे निवडसूचीस पदोन्नती समितीने शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सेवा जेष्ठता यादीतील क्रमांक |
|---|---|---|
| | **कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी)** | |
| १ | श्री. चंद्रशेखर लक्ष्मण चौधरी | १ |

त्यानुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या संवर्गातील निव्वल तात्पुरत्या स्वरुपात शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ अन्वये विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून पदोन्नती देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभियंत्याचे नाव | सध्याचे पद | सध्याचे वेतन बँड | पदोन्नतीचे पद | पदोन्नतीचे वेतन बँड | अभियंत्याचा जातीचा प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | **(यांत्रिकी)** | | | |
| १ | श्री. चंद्रशेखर लक्ष्मण चौधरी | कनिष्ठ अभियंता | S-१४ (३८६००-१२२८००) | उप अभियंता | S-२० (५६१००-१७७५००) | खुला | खुला |

तरी उपरोक्त निवडसूचीस प्रशासक म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१), ५३(२) व ५३ (३) अन्वये मंजुरी मिळणेकामी तसेच भिवंडी निजामपूर शहर महानगरपलिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गिकरण), नियम २०२२ शासन निर्णय क्र. भिनिम- २०२२/ प्र.क्र.९४/नवि-२३, दि. १४ डिसेंबर २०२२ चे परिशिष्ट-१, परिच्छेद -६ अन्वये शासन मंजुरी करीता प्रस्ताव सादर करण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**प्रशासकीय ठराव क्रमांक** ५८३ **दिनांक** २४/०९/**२०२४.**

जा.क्र./भिनिशमनपा./ आस्था./२२९६/२०२४, दि. ०५/०८/२०२४ नुसार श्री. चंद्रशेखर चौधरी यांचे उपअभियंता (यांत्रिकी) पदी पदोन्नती देणेकामी यापूर्वी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीमध्ये श्री. शेखर चौधरी यांचे न्यायालयीन प्रकरण निर्णय होईपर्यंत स्थगित ठेवण्यात आले होते. श्री. शेखर चौधरी यांची विभागीय चौकशी पूर्ण झालेली असून त्यांना दोषमुक्त केलेले आहे. तसेच मा. कोर्टाने दोषारोप किंवा ठपका ठेवलेला नाही.

याअनुषंगाने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (यांत्रिकी) (वर्ग-१) या संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या पदोन्नतीने प्रचलित शासन निर्णयान्वये भरणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदोन्नतीने भरावयाच्या उप अभियंता (यांत्रिकी) (वर्ग-१) संवर्गातील रिक्त पदांवर पदोन्नती देण्यासाठी पात्र कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) यांची निवडसूचीस सद्यस्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र. ७१ (भाग-१) नवी-१४, दि.०६/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२अ (१) तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१), ५३(२) व ५३ (३) अन्वये मंजुरी देत असून भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण), नियम २०२२ शासन निर्णय क्र. भिनिम- २०२२/ प्र.क्र.९४/नवि-२३, दि. १४ डिसेंबर २०२२ चे परिशिष्ट-१, परिच्छेद -६ अन्वये शासन मंजुरी करीता प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. शासन मंजुरीनंतर नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**